
केवळ खासगी वितरणाकरिता


खण्ड ४, अंक ३ मे २०११

India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY

श्री राम चंद्र मिशन

# पंजाब दौरा





## चंदिगढ

दि. २७ फेब्रुवारी रोजी पूज्य गुरुदेवांनी दिल्ली येथून प्रवासाची सुरुवात केली. ते काही काळ कर्नाल येथे थांबलेले असताना उत्सुक अभ्यासींच्या समुदायाने त्यांचे स्वागत केले. गुरुदेवांच्या चंदिगढ येथील आगमनाच्या वेळी सुमारे १०० अभ्यासी व लहान मुले उपस्थित होती. सहा तासांच्या कष्टप्रद प्रवासानंतरही गुरुदेवांनी एका बंधूच्या निवासस्थानाचे अनावरण केले व तेथे सत्संगाचे संचालन केले.

दि. २८ फेब्रुवारी तसेच दुसऱ्या दिवशीसुद्धा सकाळच्या वेळी गुरुदेव आपल्या कुटीरातून बाहेर आले व त्यांनी अभ्यासींसोबत सुमारे १ तास त्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देण्यात व्यतीत केला. यावेळी गुरुदेवांच्या नेहमीच्या चातुर्य व हजरजबाबीपणामुळे संभाषण खूपच गमतीपूर्ण होते.

## लुधियाना

दि. १ मार्च रोजी लुधियाना येथे आगमन झाल्यावर पू. गुरुदेवांनी अभ्यासींबरोबर अनौपचारिक गप्पा मारल्या व त्यानंतर सत्संगाचे संचालन केले. दुसऱ्या दिवशी लुधियानातील आश्रमाच्या जागेवर सत्संग झाल्यानंतर पू. गुरुदेवांच्या हस्ते पायाभरणीचा कार्यक्रम करण्यात आला. त्यानंतर आपल्या भाषणात त्यांनी पंजाबबद्दल आत्मियता व्यक्त केली व यावेळी ते पंजाबी भाषेत काही शब्द बोलले. जे आश्रमांत येत नाही त्यांच्यासाठी “तुस्सी बेवकूफ” (तुम्ही मुर्ख आहांत) हे शब्द वापरुन पूढे नाल आजा (मला सामील व्हा) असेही ते म्हणाले. पू. गुरुदेवांच्या भाषणातील काही महत्वाचे मुद्दे असे होते.

- गुरुदेवांच्या सतत भेटींमागे काय उद्देश्य आहे याचे आत्मपरिक्षण अभ्यासींनी करणे गरजेचे आहे.
- एखाद्या मार्गावरुन चालण्यापूर्वी आधीच्या मार्गाचा त्याग करणे आवश्यक आहे. तुम्ही पोहतांना कोरडे राहू शकत नाही. मला एकाच वेळी जमिनीवर उभे रहाणे व उडणे शक्य नाही. अस्तित्वाच्या एका स्थितीत येण्यापूर्वी दुसऱ्या स्थितीचा त्याग करणे आवश्यक आहे.
- धर्मामध्ये ईश्वर नाही आणि हेच सत्य आहे.
- इतरांकरिता प्रार्थना करणे योग्य आहे परंतु स्वत:करिता प्रार्थना म्हणजे भीक मागण्यासारखे आहे.

यानंतर पू. गुरुदेव दुपारच्या जेवणासाठी चंदिगढ येथे परतले.

## चंदिगढ

दि. ३ मार्च रोजी दुपारी टागोर थिएटर येथे पू. गुरुदेवांनी संचालित केलेल्या सत्संगाकरिता संपूर्ण विभागातील सुमारे ६०० अभ्यासी उपस्थित होते. प्रिय गुरुदेवांच्या सान्निध्यात असल्यामुळे त्यांच्या आनंदाला सीमा नव्हती. बंधू सतबीर व बंधू हरभजन सिंग यांच्या भाषणांनंतर बंधू गुरुप्रीत यांनी मधुर भजने गायली. दुसऱ्या दिवशी सकाळी पू. गुरुदेव सुमारे एक तास आपल्या कुटिराच्या बाहेर आले व त्यांनी अभ्यासींच्या प्रश्नांची उत्तरे दिली. संध्याकाळी त्यांनी सत्संगाचे संचालन केले.

दि. ५ रोजी सकाळी गुरुदेव जेव्हा दिल्लीला परत जाण्यास निघाले, तेव्हा अभ्यासींच्या मोठ्या समुदायाने त्यांना लवकरच परत भेटण्याची इच्छा मनात ठेऊन निरोप दिला. कर्नाल येथे काही काळ थांबून त्यांनी सत्संगाचे संचालन केले.









### दौऱ्यावर असतांना पू. गुरुदेवांकडून मिळालेले विचारधन:

- अपूर्ण इच्छांमुळे क्रोधाची उत्पत्ती होते. क्रोध आपल्या मनाला आच्छादून टाकतो व त्यामुळे विचार करण्याची क्षमता नष्ट होते ज्याच्या परिणामी स्वयंनाश ओढवतो.
- आनंद ही मनाची अशी अवस्था आहे ज्यामध्ये तुम्ही बाहेरील जगापासून पूर्णत: स्वतंत्र असतात.
- विश्वास मनाचे दरवाजे खुले करतो तर पूर्वग्रह ते बंद करतो.
- प्रेम हे हृदयापासून ते अनंतापर्यंत जाणाऱ्या एकेरी रस्त्याप्रमाणे आहे.
- आपल्या अंतस्थ आत्मिक सुहृदयाला अनेक जन्मांच्या शोधा नंतर मिळणे हेच खरे लग्न होय.
- प्रेमपूर्वक केलेली कुठलीही गोष्ट सगळ्या समस्यांचे समाधान करते.
- आत्मशक्तिचा वापर कसा करावा हे विचारल्यावर गुरुदेव म्हणाले तुम्हाला फरक तेव्हाच कळेल जेव्हा तुम्ही त्याचा वापर सुरु कराल. जर आत्मबळ पुरेसे शक्तिशाली नसेल तर इच्छा अधिक बलशाली होतात. शिस्तीमुळे इच्छा व आत्मबळ यांच्यात संतुलन राखले जाते. आत्मबळ हे मेंदुपासून नव्हे तर हृदयापासून उत्पन्न होते. आत्मशक्ती ही दिशाहीन असल्याने आपणांस कायम धोका असतो. सफाईमुळे आत्मबळास दिशा मिळते.

## रायपूर

संध्याकाळी ७.४० वाजता रायपूर विमानतळावर अत्यंत आनंदात अभ्यासींनी पू. गुरुदेवांचे स्वागत केले व त्यानंतर त्यांनी नवीन बांधलेल्या 'योगाश्रम'कडे प्रस्थान केले. आश्रमात पोहोचल्यावर पू. गुरुदेवांचे स्वागत संपूर्ण शिस्तीत व अतिशय प्रेमाने करण्यात आले. रात्री सुमारे १० वाजता पू. गुरुदेव त्यांच्या कार्यालयातून बाहेर आले व अर्धातास त्यांनी उपस्थित अभ्यासींसमवेत व्यतीत केला. दि. ८ रोजी सकाळी पू. गुरुदेव तात्पूरत्या उभारलेल्या ध्यानगृहामध्ये आले व त्यांनी सकाळी ८.३० वा. सत्संगाचे संचालन केले. सत्संगानंतर त्यांनी आपल्या 'गोल्फकार्ट' मधून आश्रमात एक फेरी मारली यावेळी एकंदरीत झालेल्या कामावर ते खुष दिसत होते.

दि. ९ मार्च, छत्तीसगढ व आजूबाजूच्या राज्यांमधील सुमारे २००० अभ्यासी अतिशय उत्कंठतेने या दिवसाची खूप पूर्वीपासून वाट बघत होते. पू. गुरुदेवांनी उद्घाटनाची फीत कापली व ९६०० वर्गफूट एवढे विस्तीर्ण व उत्तम बांधकाम दर्जा असलेले मोठे व सुंदर ध्यानगृह बघून ते अतिशय आनंदित झाले. सत्संग झाल्यावर पू. गुरुदेवांनी सर्वांना संबोधित केले.

- सहजमार्ग ही एकमेव पद्धती आहे जी अध्यात्मिकतेचे बिजारोपण करते
- अभ्यासींच्या संख्या बरोबरच गुणवत्ता देखील वाढली पाहिजे.
- ध्यानगृह हे केवळ ध्यानासाठी आहे व अभ्यासींनी त्याचा उपयोग आपल्या धार्मिक कार्यांसाठी करु नये.

केंद्रिय राखीव पोलीसांच्या जवानांना पाहून पू. गुरुदेव खूपच आनंदित झाले (सुमारे १०० केंद्रिय राखीव पोलीसांनी साधनेस सुरुवात केली) व भविष्यात त्यांच्या बटालियन्स मिशनमध्ये पहावयास मिळतील अशी आशा व्यक्त केली.

सायंकालीन सत्संग संपल्यावर लहान मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. सायंकालीन सत्संग सुरु असतांना पू. गुरुदेव त्यांच्या कुटिराबाहेर







बसले होते. यावेळी त्यांनी सुमारे ८० स्वयंसेवकांना चांदीची नाणी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. तब्येतीच्या तक्रारी असूनसुद्धा ते आनंदी दिसत होते व त्यांनी अभ्यासींसमवेत वेळ व्यतीत केला.

दि. १० मार्च रोजी पू. गुरुदेवांनी सकाळी ७.०५ मि. सत्संगाचे संचालन केले. ( ज्याची नियोजित वेळ ७.३० वा. होती) त्यानंतर सुमारे १० वा. ते एका अभ्यासीबंधूच्या घरी गेले व तेथूनच हैद्राबादचे विमान पकडण्यासाठी ते विमानतळावर रवाना झाले.

## हैदराबाद

दि. १० मार्च रोजी दुपारी १.४५ च्या सुमारास पूज्य गुरुदेवांचे हैदराबाद येथे आगमन झाले. विमानतळावर जमलेल्या अभ्यासींनी त्यांचे हर्षभराने स्वागत केले. प्रादेशिक आश्रमाकडे जाण्याच्या रस्त्यावर काही राजकीय निदर्शने होण्याची बातमी असल्याने ते विमानतळाजवळ राहणाऱ्या एका अभ्यासी बंधूच्या निवासस्थानी मुक्कामाकरिता गेले. काही वेळ विश्रांती घेतल्यानंतर पू. गुरुदेवांनी 'कान्हा शांती वनम' प्रकल्पाच्या तपशीलांची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी उपस्थितांसाठी सत्संगाचे संचालन केले.

दुसऱ्या दिवशीसुद्धा या प्रकल्पाच्या नोंदणीची माहिती अभ्यासण्यात पू. गुरुदेव व्यस्त होते. कान्हा प्रकल्पाच्या नोंदणीचा पहिला भाग ठरवल्याप्रमाणे पूर्ण होत असल्याचे समाधान त्यांना वाटले.

दि. १२ मार्च रोजी पू. गुरुदेवांच्या कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर जमा झालेल्या हजारो अभ्यासींनी त्यांचे स्वागत केले. 'उत्कृष्ट शिस्त, पाहून आनंद



वाटला' असे पू. गुरुदेव यावेळी म्हणाले. आरामदायक कोनामध्ये उभारलेल्या नवीन चढावावरून त्यांनी आपल्या कुटीरात प्रवेश केला. लवकरच त्यांनी आपल्या कार्यालयाला व बैठक-कक्षाला भेट दिली. पू. गुरुदेवांनी संचालित केलेल्या सकाळ व संध्याकाळच्या सत्संगाकरिता सुमारे ५००० अभ्यासी उपस्थित होते. 'गुरुदेवांची दाढी चांगली दिसत आहे' असे एका अभ्यासीने म्हणताच 'दाढीमागील चेहरा अधिक सुंदर आहे' अशी टिप्पणी पू. गुरुदेवांनी केली. हैदराबादच्या मुक्कामात पू. गुरुदेवांचे स्वास्थ्य व मनोवृत्ती अत्यंत उत्तम होती.

पू. गुरुदेवांच्या कुटीराचे दरवाजे सर्वकाळ खुले होते. प्रिय गुरुदेवांच्या दर्शनाकरिता दूर-दूरहून आलेल्या, वाट पाहणाऱ्या हृदयांवर या खुल्या दरवाज्यांनी फुंकर घालण्याचे काम केले. पू. गुरुदेवांच्या विश्रांतीच्या खोलीच्या बाहेर असणाऱ्या सज्जामध्ये ते जेव्हा येऊन बसत तेव्हा गुरुदेवांच्या दर्शनाच्या अनेक संधी अभ्यासींना प्राप्त झाल्या.

१३ मार्च रोजी पूज्य गुरुदेव ध्यान-कक्षाकडे जात असताना स्वयंपाकाची व्यवस्था पाहणाऱ्या गटाने त्यांचे अभिवादन केले. 'अन्नातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे त्यात मिसळलेले प्रेम' याची आठवण गुरुदेवांनी या वेळी त्यांना करुन दिली. सुमारे ६००० अभ्यासींनी संपूर्णतः भरलेल्या सभागृहात गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले. दुपारी गुरुदेवांबरोबर मुलांसाठी एका तासाच्या विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. साधकाच्या मनातील द्वंद्व तसेच सहज मार्गाकडून मिळणारी शिकवण व मार्गदर्शन यावर आधारित एक नृत्यनाटिका सत्संगानंतर सादर करण्यात आली. आपल्या कक्षातील क्लोज्ड सर्किट टेलिविजनवरुन गुरुदेवांनी या नाटिकेचा आस्वाद घेतला.







दि. १४ मार्च रोजी सकाळी ७.३० वाजता गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले. त्यांनी यावेळी दिलेल्या संदेशात चारित्र्याला बळकटी आणण्याची व हृदयातील प्रकाश सर्वत्र पसरवण्याची गरज अधोरेखित केली. दुपारी पावणे दोन वाजता विमानतळाकडे जाण्याकरिता गुरुदेवांनी प्रस्थान केले.

## चेन्नई– गुरुदेवांचे स्वगृही आगमन

सुमारे दीड महिना घरापासून लांब राहिल्यानंतर गुरुदेवांचे हैदराबाद येथून आगमन झाले. गुरुदेवांच्या दर्शनाकरिता जमलेल्या अत्यानंदित अभ्यासींनी विमानतळाचा परिसर फुलून गेला होता. यानंतर गुरुदेव 'गायत्री' या त्यांच्या निवासस्थानी गेले. त्यांनी पुढचा आठवडा विश्रांती घेत व संध्याकाळी अभ्यासींच्या भेटी–गाठी घेत व्यतीत केला. काही वेळा सत्संगाचे संचालन केले व अभ्यासींशी संवाद साधला. पुढील काही दिवस काही वेळ गायत्री येथे तर काही वेळ आश्रम अशी आपल्या वेळाची त्यांनी विभागणी केली. पुरेशी विश्रांती व काही वेळा समुद्रकिनाऱ्यावर अभ्यासींबरोबर विश्रामही त्यांना करता आला. मिशनच्या व्यवस्थापनाचे नेहमीचे काम, ई–मेल पत्रव्यवहार व नवीन प्रशिक्षक तयार करणे ही कामे नेहमीच्या जलद गतीने चालू होती.

## मणपाक्कम आश्रम येथे अभ्यासींचा महापूर

मुंबई केंद्राच्या सुमारे ५०० अभ्यासींच्या समुदायाने मणपाक्कम आश्रमाला चार दिवसांची भेट दिली. गुरुदेवांनी त्यांच्याकरिता सत्संगांचे संचालन केले. या अभ्यासींनी या भेटीचे एका कार्यशाळेत रुपांतर केले व मिशनचे प्रशिक्षक व पदाधिकारी यांना दररोज आमंत्रित करून संवादपूर्ण सत्रे आयोजित केली. त्यांनी गुरुदेवांकरिता एक केक कापला. एका संध्याकाळी आयोजित केलेला मनोरंजनाचा कार्यक्रमही गरुदेवांना अतिशय आवडला. जवळच्या तसेच दूर–दूरच्या केंद्रातील अनेक अभ्यासी मणपाक्कम आश्रमाला सतत भेटी देत असतात. केवळ गेल्या महिन्यात बाहेरगावच्या सुमारे ३३०० अभ्यासींनी गुरुदेवांच्या सानिद्ध्यात राहण्याकरिता आश्रमाला भेट दिली. दि. १० एप्रिल रोजी गुरुदेवांनी ८ विवाह संपन्न केले. त्यांच्या पायांत वेदना होत असूनही विवाह संपन्न होत असताना ते पूर्ण वेळ उभे होते.



## गुरुदेवांनी केली पिकाची कापणी

पू. गुरुदेव लालाजी मेमोरियल शाळेतील विद्यार्थ्यांबरोबर बराच काळ व्यतीत करतात व त्यांच्याकडे विशेष लक्ष पुरवितात. येथील सुमारे ६० विद्यार्थ्यांनी साधनेची सुरुवात केली आहे. यापैकी अनेक जण १८ वर्षांच्या खाली असूनही यासाठी गुरुदेवांची विशेष परवानगी त्यांना मिळाली आहे. आश्रमातील सत्संगाच्या वेळी हे विद्यार्थी पुढील रांगांमध्ये बसलेले दृष्टीस पडतात. एके दिवशी गुरुदेवांनी आपल्या कुटीरात त्यांना सिटींग दिले व त्यांच्याबरोबर भोजनाचा आस्वाद घेतला. अत्यंत समाधानाने या परिस्थितीवर भाष्य करताना ते उद्गारले, “पिकांची कापणी करणाऱ्या शेतकऱ्याच्या भूमिकेत मी सध्या आहे. या मुलांवर माझे कार्य चालू आहे. याला मी सर्वात जास्त प्राधान्य देतो, शिक्षण व बाकीच्या गोष्टींबद्दल मी फारशी चिंता करत नाही” शिक्षकाची भूमिका कशी असावी याबद्दल बोलताना गुरुदेव म्हणाले, “खरा शिक्षक तोच जो आपण काय देतो आहोत यावर लक्ष केंद्रित न करता आपले शिकवणे मुलांना समजत आहे ना याची खात्री करुन घेतो. उत्तम शिक्षक तोच जो आपल्या विद्यार्थ्यांमध्ये नवल व उत्सुकतेची भावना जागृत करतो”

## आय.एस.टी.पी. – दक्षिण विभागाकरिता

दि. १६ एप्रिल रोजी पू. गुरुदेवांनी भारत शिष्यवृत्ती प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन (आय.एस.टी.पी.) केले. या समयी दक्षिण भारतातील राज्यातून आलेल्या ५९ प्रशिक्षणार्थींसमोर त्यांनी भाषण केले. माहितीच्या मर्यादा, या आयुष्यानंतर काय या बद्दलची आपली अजाणता व सहज मार्गात सर्व काही प्राणाहूतीमार्फत कसे दिले जाते यावर त्यांनी आपले विचार मांडले. भौतिक आयुष्य खाच–खळग्यांनी भरलेले असून पूर्वीच्या संत–महात्म्यांना सुद्धा या आयुष्याच्या परिक्षांपासून व क्लेशांपासून सुटका मिळाली नव्हती असे ते या वेळी म्हणाले.





# उद्घोषणा

## नवीन नेमणुका

श्री. विजयकुमार अगरवाल
केंद्रप्रमुख, भटिंडा केंद्र

श्री. मे. ज. आनंद नारायण मुद्रे (निवृत्त)
केंद्रप्रमुख, जबलपूर केंद्र

श्री. संदिप प्रधान
केंद्रप्रमुख, ग्वालियर केंद्र

## सतखोलकरिता वैद्यकीय स्वयंसेवक

जुलै २०११ ते डिसें. २०११ या कालावधीसाठी सतखोलयेथील वैद्यकीय केंद्रामध्ये स्वयंसेवेसाठी डॉक्टर अभ्यासींसाठी नोंदणी सुरु झालेली आहे. यासाठी इच्छूकांनी लवकरात लवकर संपर्क साधावा. स्वयंसेवेचा कालावधी १५ दिवस आहे.

अधिक माहितीसाठी कृपया खालिल व्यक्तिंशी संपर्क साधावा
डॉ. सी.के.प्रसन्नकुमार,
निवासी डॉक्टर
मेडिकल सेंटर
सतखोल

## गुरुदेवांच्या ८५व्या वाढदिवस सोहळ्याचे नोंदणीकरण

तिरुप्पूर, भारत येथे होणा-या पू. गुरुदेवांच्या ८५व्या जन्मदिवस समारोहाची नोंदणी सुरु झाली आहे. भारतातील अभ्यासीनी त्यांच्या स्थानिक केंद्रावर नोंदणी करावी अशी विनंती आहे. नोंदणीसाठीचा नमुना अर्ज खालील संकेतस्थळावरुन मिळविता येईल.

परदेशी अभ्यासी संगणकाद्वारे नोंदणी करू शकतात. सर्व तपशील संकेतस्थळावर (वेबसाइट) प्रकाशित

केला आहे.


अभ्यासींना विनंती आहे कि त्यांनी नोंदणी करण्यापूर्वी आरोग्य आणि सुरक्षित प्रवासाचे सल्ले जरूर वाचावेत.

सविस्तर माहिती http://www.sahajmarg.org/july-24-celebrations/2011 या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.


## व्हिस्पर्स फ्रॉम द ब्राइटर वर्ल्ड - अ थर्ड रेव्हिलेशन

दि. २८ मार्चपासून पू. गुरुदेवांच्या संमतीने 'अ व्हिस्पर्स अ डे' च्या वर्गणीदारांना या मालीकेतील नुकत्याच प्रकाशित झालेल्या व्हिस्पर्स फ्रॉम द ब्राइटर वर्ल्ड अ थर्ड रेव्हिलेशन या प्रकाशनामधील संदेश मिळवायस सुरुवात होईल. जर आपण अजूनही या दैनिक इ-मेल सेवेचे वर्गणीदार नसाल आणि जर आपणांस वर्गणीदार होण्याची इच्छा असेल तर आपण http://www.sahajmarg.org/literature/newsletters या संकेतस्थळाचा उपयोग करु शकतात.


# नवीन प्रकाशने




हृदयीचे बोल २००७
तेलगू





हृदयीचे बोल २०१०
इंग्रजी





माझे गुरुदेव
तेलगू,नेपाळी,कन्नड





ऋतवाणी २
मल्याळम





सत्योदय
पंजाबी




सतत स्मरण
एप्रिल २०११





अप्पू ॲन्ड द स्पार्क कलेक्टर २
इंग्रजी




चारित्र्य घडण
एम पी ३ इंग्रजी

# भूतकाळाचे पूनरावलोकन



दि. ६ एप्रिल ते २३ एप्रिल १९७७ यादरम्यांन पू. गुरुदेव सिंगापूर व मलेशिया यात्रेच्यावेळी बाबूजींसमवेत होते.६ या यात्रेनंतर लगेचच मदुराई येथे दि. ३० एप्रिल रोजी त्यांचा वाढदिवस मोठ्या धूमधडाक्यात साजरा करण्यात आला. पू. गुरुदेवांच्या दैनंदिनीतून (त्यांच्या पावलांचे अनुसरण) घेतलेला मजकूर खाली देत आहोत.

दि. ३० एप्रिल १९७७– शनिवार

सर्व व्यवस्था पूर्ण झाली आहे की नाही हे पहाण्यासाठी मी वालमजी मेन्शन येथून दिड किलोमीटर दूर असणाऱ्या तलाकुलम मधील 'पेरियार मलीगी' येथे जाण्यासाठी निघालो. आज गुरुदेवांचा एकोणसत्तरावा(७९) वाढदिवस आहे व हा समारोह अखिल भारतीय स्तरावर साजरा करण्यासाठी आशिर्वादरुपी परवानगी मदुराई केंद्राला मिळालेली आहे.

स. ९:३० वा.– गुरुदेवांचे काही मिनीटे अगोदरच आगमन झाले व त्यांचे स्वागत प्रेमपूर्वक सकाळी ८ वाजेपासून सभागृहात वाट बघत बसलेल्या सुमारे १००० अभ्यासींनी केले. गुरुदेवांनी २० मिनीटांच्या समुह सत्संगाचे संचालन केले. येथे एवढ्या सकाळी देखिल खूप उष्णता आहे. गुरुदेवांसाठी खास उभारण्यात आलेल्या उंच व्यासपीठावर गुरुदेव बसले होते व त्यांच्या आजूबाजूला दोन टेबलफॅन घरघरत होते. एवढे असूनदेखिल मी त्यांना होणारी गैरसोय बघू शकत होतो. प्राणाहूती सौम्य व विरळ होती.

सत्संग झाल्यावर गुरुदेवांनी काहीवेळ विश्रांती घेतली त्यानंतर त्यांनी एका वेगळ्या ठिकाणी प्रसाद दिला व त्यानंतर ते परत व्यासपीठावर येऊन बसले. यानंतर काही भाषणे झाली. गुरुदेवांनी वालमजी मेन्शन येथे परत जाण्याअगोदर साडेअकरावाजेपर्यंत विश्रांती घेतली.

गुरुदेव संध्याकाळी ६ वाजता सभागृहात परत आले व त्यांनी सायंकालीन सत्संगाचे संचालन केले. ते मला म्हणाले "मी अर्धे काम सकाळी पूर्ण केले आहे व अर्धे मी आता पूर्ण करेन."

.....आजची पुस्तकविक्रीची एकूण रक्कम रु. ३०००/–! आम्ही रात्री ९ वा. घरी आलो. गुरुदेवांसोबत काही वेळ व्यतीत करण्यासाठी बरेच अभ्यासी आले होते. सगळेजण कार्यक्रमाच्या व्यवस्थेची व गुरुदेवांनी दिलेल्या सिटींग्जची प्रशंसा करत होते. गुरुदेव म्हणाले " ही सगळी लालाजी साहेबांची देणगी आहे. आलेल्यांपैकी कोणीही रिक्त हस्ताने परत जाणार नाही"

## भगिनींचा अभ्यासगट, इंदौर, मध्यप्रदेश

जरी बंधू आणि भगिनींमध्ये अभ्यासी म्हणून काही फरक नसला तरीसुद्धा दोघांनाही जिवनात वेगवेगळ्या भुमीका वठवाव्या लागतात, रोजच्या जिवनांत दोघांनाही वेगवेगळ्या परिस्थीतीला सामोरे जावे लागते व त्या परिस्थितीमध्ये अध्यात्मिक तत्वे अंगीकारावी लागतात.

या विशिष्ट समस्यांना ओळखून, भगिनींच्या एका गटाने पूढाकार घेऊन प्रत्येक तिसऱ्या शुक्रवारी सत्संगाकरिता व त्यांच्या साधनेमध्ये येणाऱ्या विविध समस्यांवर चर्चा करण्याकरिता भेटायचे ठरविले.

पहिली बैठक भगीनी कला यांच्या घरी दि. १८ मार्च रोजी झाली. सुमारे २० भगीनी यावेळी सत्संगाकरिता उपस्थित होत्या त्यानंतर गुरुदेवांचे पूस्तक 'गुरु ॲन्ड गोल' मधील एक प्रकरणाचे वाचन करण्यात आले. चारित्र्यनिर्माणाचे महत्व यावर देखिल यावेळी चर्चा करण्यात आली. आपले संपूर्ण आयुष्य आपण आनंद मिळवण्याकरिता व दु:ख टाळण्याकरिता प्रयत्न करित असतो. आता ते आपल्याला काळाची गरज ओळखून सेवा भावनेने वागावयास सांगत आहेत. यावेळी साधनेच्या विविध अंगांवर देखिल चर्चा करण्यात आली. या गटास आशा आहे की हळूहळू हे वाढत जाईल व याचा फायदा जास्तीत जास्त अभ्यासींना मिळेल.

## युवक मेळावा – मुंबई

दि. ५ मार्च रोजी दु. २ वा. बाबूजी मेमोरिअल आश्रम पनवेल येथे दोन दिवसीय अखिल महाराष्ट्र व गोवा युवक मेळाव्याची सुरुवात झाली. या कार्यक्रमाची संकल्पना होती मोहजालातून बाहेर पडणे. या मेळाव्याला १५० अभ्यासींनी हजेरी लावली. या मेळाव्याची अभ्यासपूस्तिका गुरुदेवांच्या शिकवणींवर आधारित होती व पूणे व मुंबईच्या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली होती. यावेळी मिशनच्या युवकांमध्ये असलेले असामान्य असे गुण प्रकर्षाने समोर आले. पूणे केंद्राच्या सहभागींनी 'हू मुव्हड माय चिज?' ही नाटिका सादर केली तर मुंबईच्या अभ्यासींनी 'असे जगा जणू काही तुम्ही पुढच्या क्षणी मरणार आहात' या नावाची नाटिका सादर केली. बंधू संजय भाटिया, बंधू संतोष श्रीनिवासन व बंधू सुभाष वैद्य यांनी आपले विचार व्यक्त केले ज्यापासून सहभागींना प्रेरणा मिळाली. यावेळी गट चर्चा व आत्मपरिक्षण सत्र देखिल आयोजित केले गेले. या मेळाव्यातील वातावरण भंडाऱ्याच्या वेळेस असणाऱ्या वातावरणाशी मिळतेजुळते होते. गुरुदेवांचे अस्तित्व ठळकपणे जाणवत होते. या मेळाव्यात सहभागी युवकांना खुपच फायदा झाला.







## बडोदा, गुजरात येथे हॉटेल मॅनेजमेंट शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांना दिलेले प्रकटन

दि २६ फेब्रुवारी रोजी गुजरात इन्स्टिट्यूट ऑफ़ हॉटेल मॅनेजमेंट (GIHM) आणि पॉडिचेरी विद्यापीठ (MBA) च्या विद्यार्थ्यांसाठी एका खुल्या मंचाचे आयोजन केले होते. साध्या उदाहरणांसोबत सहजगत्या समजेल अशा भाषाशैलीद्वारे सहजमार्ग साधना पद्धतीमधील ध्यान व शुद्धीकरण या संकल्पना समजावण्यात आल्या. युवकांमध्ये स्फूर्ती व उत्साह ओसंडत होता. महाविद्यालयीन जीवनातून बाहेर पडून हॉटेल व्यवसायामधील कठोर सत्याला सामोरे जाण्याचे दिवस जवळ आले असल्याने त्या अनुशंगाने समतोल जीवन व हृदयाचे बोल ऐकणे या मुद्द्यांवर भाषण दिले गेले. विद्यार्थ्यांनी या युवा वक्त्यांना लक्षपूर्वक ऐकले. ९२ विद्यार्थ्यांपैकी ५६ विद्यार्थ्यांनी साधनेला सुरुवात करण्याची इच्छा दर्शविली. सहजमार्गाची पत्रके वाटण्यात आली. ओतप्रोत उर्जा असलेले हे युवक ही उर्जा योग्य दिशेकडे मार्गदर्शीत करतील अशी आशा आहे. या शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष या कार्यक्रमाने आनंदी झाले होते आणि त्यांनी अशा प्रकारच्या कार्यशाळांचे आयोजन आणखी होत राहावे याकडे कल दर्शविला.

## बडोदा, गुजरात येथे पालकत्वावर कार्यशाळा

बडोदा हायस्कूल येथे पालकांसाठी एक कार्यशाळा घेण्याची संधी व्हि.बी.एस.ई. च्या स्वयंसेवकांना मिळाली. घरेलू वातावरण, पालक व मुले यांच्या एकमेकांकडून अपेक्षा, मुलांच्या भावना जपणे, प्रेम, शिस्त, स्वातंत्र्य आणि वातावरण यासारख्या विषयांवरील सांघिक चर्चेने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. सध्याच्या पालक व वाढत्या मुलांच्या मधील तक्रारी व समस्यांना आधारून हे विषय निवडले गेले होते. आपल्या प्रशिक्षकांनी सहज मार्गाच्या दृष्टीकोनातून पालकत्वावर भाषण दिले. मन शांत व हृदय खुले ठेऊन अवघड परिस्थितींचा सामना त्यांनी कसा केला अशा पालक या नात्याने त्यांच्या स्वत:च्या अनुभवांवरून ते बोलले. ३ तासाच्या या कार्यशाळेमध्ये पालक पूर्णपणे रमले होते व त्यांनी स्वयंसेवकांसमवेत हितगुज केले. कार्यशाळेमध्ये सहभागी झालेल्या ३० पालकापैकी १५ जणांनी साधना सुरु करण्याकडे कल दर्शविला. या कार्यक्रमाची प्रशंसा केली गेली व शाळेने अशा कार्यशाळा पुन:पुन: व्हाव्यात अशी विनंती केली.



## बेंगलोर येथे "निसर्ग आणि मी" – उन्हाळी सत्र

बेंगलोर येथील बनशंकरी आश्रमामध्ये दि. ८ एप्रिल ते १० एप्रिल दरम्यान ३ दिवसाच्या ७ ते १५ वर्षाच्या वयोगटाच्या मुलांसाठी घेतल्या गेलेल्या रहिवासी उन्हाळी सत्रामध्ये ८० उत्साही मुलांनी भाग घेतला. निसर्गाच्या ५ मूलभूत तत्वांच्या आधारे मुलांना ५ गटात विभागले गेले. प्रत्येक गटांमध्ये सांघिक चर्चा, कला व कृती आणि आपापल्या तत्वावर प्रकटन असे कार्यक्रम होते. औषधी वनस्पतींवर दिल्या गेलेल्या एका प्रकटनामुळे मुलांच्या वनस्पतींच्या या अंगाकडे पाहण्याला चालना मिळाली. ५ इंद्रियावर आधारित एका खेळामुळे त्यांना समजले की आपण कितीतरी सीमित रित्या त्यांचा वापर करतो.

दुसरा दिवस टाकाऊ वस्तुंवर प्रक्रिया करुन त्यांचा पुन्हा वापर करणे, वापरलेल्या वस्तुंचा पुन्हा दुसऱ्या कामाकरिता वापर करणे व काटकसर यासारख्या संकल्पनाचा होता. एका तज्ञांनी पावसाच्या पाण्याचा योग्य साठा व वापर यावर प्रत्यक्षिकाद्वारे एक प्रकटन दिले. 'टाकाऊ ते टिकाऊ' या तत्वावर आधारित वृत्तपत्रापासून सुरेख पात्रे, पेन स्टॅंड तसेच जुन्या प्लॅस्टिक बाटल्यांपासून सुंदर फुलदाणी यासारख्या कलाकृतींमध्ये मुले रमून गेली. कुंभाराच्या चाकावर पात्रे तयार करण्यामध्ये मुलांना खूपच मजा आली. त्यानंतर लपलेला खजिना शोधणे, प्रश्नमंच, बाहुल्यांचा खेळ व चित्रपट यासारखे कार्यक्रम झाले.

आंतरिक निसर्गावर आधारित तिसरा दिवस होता. या विषयावर मुल्याधारित शिक्षण पद्धतीनुरुप असलेल्या संकल्पना काही खेळांमार्फत मुलांना समजावण्यात आल्या. मुलांनी केलेया कलाकृतींचे प्रदर्शन पालकांसाठी खुले केले गेले. प्रत्येक गटांनी तयार केलेल्या प्रेम, धैर्य व संतुष्टता या सारख्या विषयांवरच्या नाटिका प्रस्तुत केल्या.



# निबंधलेखन उपक्रमाच्या प्रमाणपत्रांचे वितरण

दिल्ली: दि.२६ फेब्रुवारी रोजी, बंधू ए.पी.पाल्टा (विभागप्रमुख) यांनी १७ विभागीय पारितोषक विजेत्यांना व एका राष्ट्रीय विजेत्याला पारितोषिके प्रदान केली. उज्ज्वल भविष्यासाठी मानवी मूल्ये मुलांमधे रुजविण्यास अशा प्रकारचे उपक्रम कशा प्रकारे सहाय्य करतात यावर आपल्या भाषणात बंधू ए.पी.पाल्टा यांनी जोर दिला. पारितोषक विजेत्यांनी मिशनचे आभार मानले व निबंधलेखनात आलेले अनुभव व कल्पना त्यांनी व्यक्त केल्या.


दिल्ली

मदुराई : दि. २ फेब्रुवारी रोजी, सुमारे ७०० हून अधिक अभ्यासी, २०० विद्यार्थी, १०० पालक आणि शिक्षक जमले होते. श्रीमती पद्मा रामचंद्रन आणि डॉ. पी. रामचंद्रन प्राचार्य, मदुराई इव्हनींग कॉलेज यांनी पारितोषक वितरण केले. श्री. अशोक, प्रोग्राम एक्झिक्युटीव्ह ,आल इंडिया रेडिओ यांनी अध्यात्मिक शिक्षणाचे महत्व यावर भाषण केले.


मदुराई

मुझफ़्फ़रपूर : मुझफ़्फ़रपूर येथे दि. २७ फेब्रुवारी रोजी, शिक्षक, पालक व प्राचार्य मिळून जवळजवळ १५० हून अधिक लोक उपस्थित होते. श्री. एस. एम. राजू (आयएएस) हे प्रमुख पाहुणे होते. बक्षिसे प्रदान केल्यानंतरच्या भाषणात श्री. एस. एम. राजू यांनी तरूणांमधे ध्यान, स्वयंनियंत्रण आणि चारित्र्य घडण याबद्दल जागरुकता घडवून आणल्याबद्दल सहजमार्गाचे कौतुक केले. भविष्यात होणाऱ्या अशा प्रकारच्या उपक्रमामधे अधिक उत्साहाने सहभागी होण्याचे वचन यावेळी विद्यार्थी व शिक्षकांनी दिले.


मुझफ़्फ़रपूर

रोहटक : दि. ८ फेब्रुवारी रोजी, आंबेडकर हॉल, एम डी युनिव्हर्सिटी (एम डी यु) रोहटक येथे उपकुलगुरू, प्रा. आर .पी. हुडा आणि त्यांची पत्नी श्रीमती वेदवती हुडा हे प्रमुख पाहुणे होते. विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, अभ्यासी व त्यांची मुले मिळून जवळजवळ ४०० जण या उपक्रमात सहभागी झाले होते. याप्रसंगी निबंधलेखन, एस.आर.सी.एम., यु.एन.आय.सी., व्हि.बी.एस.ई. आणि सहजमार्ग यावर भाषणे झाली.

चंदीगढ : दि. १८ फेब्रुवारी रोजी, गोल्डन ज्युबिली हॉल, पंजाब युनिव्हर्सिटी येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कला शाखेच्या प्रमुखांना मुख्य पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते. 'युवावस्था: वचन आणि परिश्रमाचा काळ.' या विषयावर हा कार्यक्रम केंद्रीत केला होता. बक्षिस वितरणानंतर छोटीशी चित्रफीत दाखवण्यात आली.


चंदीगढ

प ांबी : दि. २७ फेब्रुवारी रोजी, आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ८ पारितोषक विजेत्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. बरेचसे विद्यार्थी, पालक आणि संस्थांचे प्रमुख यामध्ये सहभागी झाले होते. बंधू रामन भ ाथिरीपाद आणि बंधू नारायणन यांनी प्रमाणपत्रे प्रदान केली. सर्व विद्यार्थ्यांनी आपली मते व्यक्त केली. मुलांमधे मानवी मूल्ये विकसीत करण्याच्या मिशनच्या भुमिकेबद्दल पालकांना फार कौतुक वाटत होते.


मेरठ

मेरठ : मेरठ येथे ४८४ शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या होत्या. तिनही विभागाचे मिळून एकूण १६६५३ सहभागी होते. मूल्यमापनानंतर त्या पैकी ६४७ जणांना प्रमाणपत्रे देण्यात आली. या उपक्रमात भाग घेतलेल्या सर्वांना त्यांच्या पालक व शिक्षकांसहीत आमंत्रित करण्यात आले होते. प्रशिक्षकांनी सर्व पाहुण्यांना सहजमार्गाची माहिती दिली. इच्छुकांना मिशनची माहितीपुस्तिका व साहित्य देण्यात आले.

सुल्तानपूर दि. २० फेब्रुवारी रोजी, सुल्तानपूर येथे झालेल्या कार्यक्रमात ६०० विद्यार्थी, त्यांचे पालक व जिल्ह्यातील ९७ महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते. विद्यार्थी आश्रमाच्या वातावरणाने प्रभावित झाले होते व मिशनबाबत अधिक जाणून घेण्यास उत्सुक होते. अलाहाबाद, जौनपूर व वाराणसी या जवळपासच्या केंद्रातील बरेचसे अभ्यासी या कार्यक्रमाला हजर होते. 'अध्यात्मातील तरूणांची भुमिका' या विषयावर डॉ. शिवमोहन पांडे यांनी आपले मत व्यक्त केले.


सुल्तानपूर


शाहजहांपूर

# श्री राम चंद्र मिशन

## एकोज इंडिया वार्तापत्र

दि. २७ फेब्रुवारी रोजी, मोरादाबाद आश्रमात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ९५ शाळांमधील १८० विद्यार्थी, त्यांचे पालक व शिक्षक सहभागी झाले होते. भगिनी नीलम यांनी निबंधलेखन उपक्रमासाठी निवडलेल्या तीनही विषयांवर भाष्य केले. बंधू श्रावणकुमार यांनी सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरीत केली. सर्व पाहुणे प्रसन्न वातावरणाचा आनंद घेताना दिसत होते. बऱ्याच जणांनी सहजमार्गाविषयी चौकशी केली व या मार्गात येण्याची इच्छा प्रकट केली.

शाहजहांपूर केंद्रामधे दि.२७ फ़ेब्रुवारी रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. केंद्राअंर्तगत ४५ शैक्षणिक संस्थांमधे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.प्रमुख पाहुणे डा. रमा शंकर मौर्य (एडीएम) यांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली. केंद्र प्रमुखांनी मिशनचा परिचय करून दिला. बंधू भगवान दास यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील हेतु विषद केला.

गुलबर्गा : दि. २ फ़ेब्रुवारी रोजी ५० विद्यार्थी त्यांच्या पालक व शिक्षकांसह समारंभास हजर होते. बंधू प्रल्हाद पाकनिकर, बंधू श्रीकांत जोशी आणि बंधू राजू यांनी सहजमार्ग प्रणालीतील ठळक गोष्टी विषद केल्या.

हुबळी : दि.१३ फ़ेब्रुवारी रोजी प्रमुख पाहुणे श्री. व्ही. ए. मचाकनूर ,केएएस, अतिरिक्त आयुक्त, शिक्षण विभाग, धारवाड जिल्हा म्हणाले की आपण त्यांच्याच विभागाचे काम करत असल्याने ते आनंदित आहेत. त्यांनी शिक्षणामधील मूल्यांच्या गरजेवर जोर दिला. बंधू (डाक्टर) बार्कोल यांनी निबंध उपक्रम आयोजित करण्याचा हेतू व त्याचा तरूणांच्या जडणघडणीच्या काळामधे होणारा परिणाम याची माहिती दिली.

बिदर : दि.२७ फ़ेब्रुवारी रोजीच्या कार्यक्रमासाठी सुमारे ५० विद्यार्थी, पालक व शिक्षक एकत्रीत जमले होते. बंधू हरीलाल चव्हाण (केंद्रप्रमुख) निबंध उपक्रम आयोजीत करण्याचा हेतू व त्यास सन २०१० मध्ये मिळालेला प्रचंड प्रतिसाद यावर बोलले. बंधू राजू यांनी अध्यात्माची गरज व सहजमार्गाचे तत्वज्ञान विषद केले. विद्यार्थी व संस्थांना प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली. सहजमार्ग सरावाची मूळ पुस्तिका १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांना देण्यात आली.

अनेक विद्यार्थ्यांनी निबंध लेखनाच्या तयारीचा अनुभव कथन केला. विद्यार्थ्यांनी सांगितले की त्यांनी चरित्र, स्वातंत्र्य, महत्वाकांक्षा व आकांक्षा यावर कधीच चिंतन केले नव्हते. त्यांना याबाबतचा खरा अर्थ तयारी करताना उलगडला याचे आश्चर्य वाटत होते. पालकांनी देखील विषयांबाबत समाधान व्यक्त केले व मिशनच्या प्रयत्नांची तारीफ़ केली. त्यातील काहींनी मिशनमधे सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली.

बेल्लारी : दि.२ फ़ेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ७ शाळांमधील २५ विद्यार्थी सहभागी झाले होते. एस.आर.सी.एम. चा परिचय व त्यानंतर निबंध उपक्रमाबाबत काय वाटले यावर विद्यार्थी बोलले. अध्यात्मिकता व जीवनातील मूल्ये याबाबत त्यांना झालेल्या तीव्र जाणीवेचा तो एक सबळ पुरावा होता.

हुम्नाबाद : दि. ६ मार्च रोजी १५ लोकांच्या उपस्थितीत बंधू. बक्करेड्डी यांच्या घरी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली. बंधू श्रीकांत जोशी यांनी "अध्यात्माची गरज" यावर छोटेसे भाषण केले.

लखनौ : लखनौ शहरातील ९५ संस्थांमधे निबंध उपक्रम आयोजित करण्यात आला. दि.२७ फ़ेब्रुवारी रोजी ४०० विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी या समारंभास हजेरी लावली. प्रा. ए. के. श्रीवास्तव, विभाग प्रमुख, समाजशास्त्र लखनौ विश्वविद्यापीठ हे प्रमुख पाहुणे होते व त्यांनी बक्षीसे प्रदान केली.


शाहजहांपूर


गुलबर्गा


हुबळी


बिदर


बेल्लारी


हुम्नाबाद



## बंधू ए.पी. दुराई यांची मँगलोर (कर्नाटक) भेट

मिशनचे संयुक्त सचिव श्री. ए.पी. दुराई यांनी २४ फेब्रुवारी रोजी मँगलोर केंद्राला भेट दिली. सुमारे ५० अभ्यासी या प्रसंगी उपस्थित होते. भगिनी नलिनी यांनी नविन अभ्यासींच्या उपयोगाकरिता प्रार्थनेचा अर्थ उलगडून दाखवला.

आश्रमाच्या उभारणीकरिता जमिनीचा शोध घेण्याकरिता बंधु सुब्रया पै, बंधू प्रसाद कृष्णा, भगिनी लता होल्ला, बंधू गणेश व बंधू राधाकृष्ण यांची समिती नियुक्त करण्यात आली. गुरुदेवांच्या प्रति श्रद्धा ठेऊन कामाची सुरुवात केल्यास त्यासाठी लागणारी साधन–सामुग्री निश्चितच उपलब्ध होईल असे बंधू दुराई या वेळी म्हणले.

अभ्यासींबरोबर वार्तालाप करताना बंधू दुराई यांनी मांडलेले काही विचार खाली दिले आहेत:

- 'तूच एकमात्र ईश्वर आणि शक्ति आहेस जो आम्हाला त्या स्थितीपर्यंत नेऊ शकेल' याचा अर्थ काय? गुरुदेवांना ईश्वर व शक्ती म्हणून स्वीकारून आणि आपली श्रद्धा त्यांच्यावर ठेऊन आपण धीट व धैर्यवान बनत असतो. कुठल्याही दडपणांना व शक्तिमान व्यक्तींच्या अनैतिक हुकूमांना बळी न पडण्याची शक्ती यापासून मिळते.

- संतापाचा रोख स्वत:वर असेल तरच तो उत्तम असतो. आपल्या चुका व त्रुटी दुरुस्त करण्यासाठी त्याचा उपयोग होतो.

- प्रार्थना म्हणजे भीक मागणे नव्हे. भिक्षेची थाळी हाती घेऊन, अत्यंत नम्रपणे आपण काय मागावे याचा विचार न करता, जे काही गुरुदेव देतील त्याचा स्वीकार करणे म्हणजे प्रार्थना. यामध्ये कुठलीही अपेक्षा नसते. आपण जेव्हा अशा प्रकारे प्रार्थना करतो तेव्हा गुरुदेवांना स्वत:ला परमेश्वरकडून दैवी शक्ती प्राप्त होतात.

- 'आपण कर्ते–करविते आहात, मी आपल्या हातातील केवळ एक साधन आहे' या विचारसरणीसहित गुरुदेवांप्रति संपूर्ण श्रद्धा आपले कार्य पार पाडण्याकरिता परमेश्वरी शक्ती आकर्षित करते.

- गुरुदेवांची पुस्तके पुन्हा–पुन्हा वाचण्याची गरज, सत्संगानंतर पुस्तकांची सादरीकरणे, अभ्यासींच्या निवासस्थानी मेळावे आयोजित करणे यांची उपयुक्तता बंधू दुराई यांनी अधोरेखित केली. गुरुदेवांचे लक्ष स्वत:कडे वेधण्याची युक्ती म्हणजे त्यांच्याकरिता काम करणे ही होय.

## तिरुपूर येथील अनेकविध कार्यक्रम– मार्च २०११

४ व ५ मार्च रोजी चे ीपलायम योगश्रम येथे झालेल्या तामिळनाडूतील प्रशिक्षकांच्या बैठकीचे अध्यक्षपद मिशनचे संयुक्त सचिव श्री. ए.पी. दुराई यांनी भूषविले.

६ मार्च रोजी बंधू दुराई यांनी सत्संगाचे संचालन केले. यानंतर संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम, अभ्यासींमध्ये गट–चर्चा, प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम इत्यादी आयोजित करण्यात आले होते.

गुरुदेवांच्या जन्म–दिवसाचा समारंभ तिरुपूर येथे आयोजित करण्याबद्दल गुरुदेवांनी अनुमति दिली आहे. याकरिता एका समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. ९ मार्च रोजी या समितीच्या सदस्यांनी एक बैठक घेतली. मिशनचे सचिव बंधू उमाशंकर वाजपेयी यांनी सत्संगाचे संचालन केले व प्रास्ताविक सत्राचा कार्यक्रम केला. यानंतर या समितीने डायमंड ज्युबिली पार्कला भेट देऊन निरनिराळ्या विभागांच्या स्वयंसेवकांबरोबर तेथील व्यवस्था व सोयी–सुविधा याबाबत चर्चा केली.

नवीन अभ्यासींकरिता अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम त्याच दिवशी आयोजित केला होता. अनेक जुन्या– जाणते अभ्यासीसुद्धा या कार्यक्रमात सहभागी झाले व या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

## आत्मनिरिक्षणाचा समय– नत्रमपल्ली– तामिळनाडू येथील युवा कार्यक्रम

सुमारे ८५ अभ्यासींकरिता १२ व १३ मार्च रोजी नत्रमपल्ली आश्रम येथे युवा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आश्रम व्यवस्थापक बंधू भरतराजन व बंधू लक्ष्मीनारायणन यांनी 'सहज मार्गामध्ये युवकांची भूमिका' या विषयावर उपस्थितांना संबोधित केले. या कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य म्हणजे स्व–विश्लेषण, ज्यामध्ये अभ्यासींना अनेकविध प्रसंगांमध्ये स्वत:चे निरिक्षण करण्याची संधी मिळाली. ज्योतिष शास्त्रावरील विश्वास, आध्यात्मिक विवाहांचे महत्त्व, परंपरेचे महत्त्व या विषयांवरील समूह–चर्चांमुळे अभ्यासींना खोलवर विचार करण्याची तसेच आपल्या विचारांच्या देवाण–घेवाणीची संधी मिळाली. या दिवसाचा शेवट प्रेरणादायी चलतचित्रपट 'स्पिरीट' पाहून झाली.

दुसऱ्या दिवशीची सुरुवात बंधू रघुपति यांच्या 'युवक– सहज मार्गाचे भविष्य' या भाषणाने झाली. 'आध्यात्मिक स्थितीचे जतन कसे करावे' यावर बंधू श्रीराम यांनी एक सादरीकरण केले. सहज मार्ग साधनेची मूळ तत्वे व मिशनच्या इतर कार्यक्रमांवर आधारित एक कोड्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. दुपारी दाखवलेला व्हिडियो कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायक होता. आपल्या आयुष्यातील इच्छाशक्ती व चांगल्या विचारांचे महत्त्व या कार्यक्रमाने अधोरेखित झाले. अभ्यासींनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या व असा कार्यक्रम वर्षातून किमान दोन वेळा व्हावा अशी विनंती केली.





## बंध व चर्चा – नेवेली हब, तामिळनाडू



दि. २० मार्च रोजी नेवेली हब पुदुचेरी येथे एक मेळावा आयोजित करण्यात आला होता. पुदुचेरी, कुडालोर, विल्लूपूरम, नेवेली या केंद्रांमधून सुमारे १०० अभ्यासींनी यामध्ये भाग घेतला होता.

पुदुचेरी केंद्राने 'ध्यानाचे महत्व' व 'स्वत:ला बदला' या विषयांवर सादरीकरण केले. कुडलूर केंद्राने 'स्वत:ला शिस्त लावा' या विषयावर तर विल्लूपूरम केंद्राद्वारे 'चारित्र्य निर्माण' या विषयावर आणि नेवेली केंद्राने 'तत्वे व नैतिकता' या विषयावर सादरीकरण केले. हे सादरीकरण सत्र अतिशय माहितीपूर्ण होते व विचार करायला लावणारे होते. ही सादरीकरणे मुख्यत: संवादपूर्ण व प्रत्येकास सक्रीयरित्या सहभागी करुन घेणारी होती.

या मेळाव्याने विविध केंद्रांच्या अभ्यासींना एकमेकांचा परिचय करुन घेण्याची संधी मिळाली व यामुळे बंधूभाव वाढीस लागला.

## ध्यानगृहाचे उद्घाटन तिरुतुरईपूंडी, तामिळनाडू



मागील वर्षी ऑक्टोबरमध्ये सुमारे २५ अभ्यासींनी मिशनमध्ये प्रवेश केल्यानंतर सहजमार्गाचे तिरुतुरईपूंडी केंद्र अस्तित्वात आले. तेव्हापासून या केंद्रावर नियमीतपणे रवीवार सत्संगाचे आयोजन करण्यात येते.

दि. ७ मार्च रोजी विभागीय प्रमुख बंधू एस. प्रकाश यांनी ४० अभ्यासींच्या उपस्थितीत नवीन ध्यानगृहाचे उद्घाटन केले. हे ध्यानगृह एका अभ्यासीच्या घराच्या वरच्या मजल्यावर आहे. दि. १३ मार्च रोजी एका खुल्या चर्चासत्राचे देखील आयोजन करण्यात आले. परिसरातील इतर केंद्रांच्या प्रशिक्षकांच्या सहकार्यामुळे या केंद्राची होणारी प्रगती खरोखरच आनंदित करणारी आहे.



## चर्चासत्र तेनकासी, तामिळनाडू

दि. २७ फेब्रुवारी रोजी तेनकासी केंद्राने युवकांसाठी चर्चासत्राचे आयोजन केले होते. यामध्ये ८ बंधू व ३ भगीनी अश्या ११ जणांनी भाग घेतला होता. चर्चासत्राचा विषय होता ' आपले केंद्र व मिशनचा उपयोग करुन स्वत:ला कसे विकसीत करावे'. सर्वानुमते आपण नियमीत साधना करणे अतिशय महत्वाचे आहे कारण त्याद्वारेच आपण समतोल अस्तित्व प्राप्त करु शकतो. सर्व अभ्यासींच्या सक्रिय सहभागामुळे चर्चा अतिशय रंगली होती.

## कार्यकारिणी बैठक, गुजरात

दि. ९ व १० एप्रिल रोजी अहमदाबाद विभागीय आश्रमामध्ये उत्तर गुजरात विभागाच्या (विभाग ६ अ) सुमारे ५० कार्यकारी सदस्य व समन्वयकांची वार्षिक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे मुख्य उद्दीष्ट विविध कामे व केंद्रांच्या वाढीच्या अनुषंगाने मागील वर्षाच्या प्रगतीची समिक्षा करणे व आर्थिक वर्ष २०११–१२ साठीच्या प्रगतीचे नियोजन करणे होते.



बंधू राजेश अग्रवाल (विभागप्रमुख) यांनी सांगीतले की आपला आपल्या गुरुदेवांवर पूर्ण विश्वास असला पाहिजे व तो आपल्या कामामध्ये सकारात्मक दृष्टिकोन व आत्मविश्वासाच्या स्वरुपात प्रतिबींबीत झाला पाहिजे. पहिल्या सत्रामध्ये केंद्र प्रमुख / केंद्र व्यवस्थापक / सबझोन समन्वयक यांच्याद्वारे सादरीकरण करण्यात आले. प्रत्येक गटाने बंधू ए.पी. दुरै यांच्या 'संख्यात्मक व गुणात्मक वाढ' या भाषणावर चर्चा देखील केली.

दुसऱ्या दिवशी विविध कामांसाठी नियुक्त विभागीय समन्वयकांद्वारे सादरीकरण करण्यात आले जसे की निबंध लेखन, प्रकाशन, व्हि.बी.एस.ई., ओळखपत्रे, लेखाविभाग, घरगुती मेळावे/खुले चर्चासत्र, प्रशिक्षण, युवक व एकोज वार्तापत्र इत्यादी. आपापल्या विभागाचे त्यांनी अतिशय परिणामकारकतेने सादरिकरण केले. सर्व सहभागींना मुल्यमापनासाठी मार्गदर्शनपर संहिता देण्यात आली.

या मेळाव्यासाठी बंधू अंकीत व्यास व बंधू केजल कंसारा यांनी सुत्रसंचालन केले. बंधू राजेश यांनी समारोप करतांना प्रत्येकास विनंती केली की त्यांनी आपला उत्साह पूर्ण वर्षभर असाच टिकवून ठेवावा व तो स्वयंसेवकांमध्ये देखिल हस्तांतरित करावा.

# प्रकाशाचे केन्द्र





१९७४ साली, आर. एस. पुरम येथील एका अभ्यासीच्या घरी कोइंबतुर केन्द्र कार्यन्वित झाले. १९६८ सालच्या बाबूजींच्या भेटीमध्येच येथे बी पेरण्याचे कार्य झाले होते. त्यानंतर, आर. एस. पुरम येथील 'गोल्ड मिस्ट' अपार्टमण्ट्च्या तळघरातील एका मोठ्या कक्षामध्ये अभ्यासींचे रविवारचे सत्संग स्थलांतरीत करण्यात आले जेथे २०० अभ्यासी बसु शकत होते. २० मे, १९९१ रोजी गुरुदेवांनी ह्या कक्षाचे उद्घाटन केले. उद्घाटनपर भाषणात गुरुदेवांनी कोइंबतुर केन्द्राची प्रगती संथ गतीने होत असल्याबद्दल खेद व्यक्त केला होता.



केरळच्या पश्चिमी घाटांच्या पलीकडे असलेल्या पलक्कडपासुन एक तासाच्या अंतरावर असलेल्या नाचिपाल्यम गावामध्ये ३१ एकर जमीन (सोळा एकर आश्रमसाठी) विकत घेवून कोइंबतुर केन्द्राने प्रगतीची एक मोठी झेप घेतली. ह्या जागेचे नोंदणीकरण गुरुदेवांच्या हस्ते दि. १ नोव्हेंबर २००० साली केले गेले.

एक विशाल व भव्य असे ध्यान कक्ष ह्या जागेवर बांधण्यात आले व ५ जानेवरी २००७ रोजी गुरुदेवांनी त्याचे उद्घाटन केले.




ह्या ध्यानकक्षाच्या आत साधारण १००० व बाहेर वरन्ड्यात ५०० अभ्यासी सहज बसु शकतात. गुरुदेवांना मलमपुराला जाता येता ह्या आश्रमामध्ये थांबून विश्रांती घ्यायला आवडते. मोठया प्रमाणात लावण्यात आलेल्या झाडांची वाढ होत असल्याने हे एक हिरवळीचे बेट बनले आहे ज्याच्या भोवती अभ्यासींची वसाहत तयार झाली आहे.

येथे दिलेल्या भाषणामध्ये गुरुदेव म्हणाले, "आधी गुरुदेवांवर प्रेम करा. मग ध्यान व शुद्धिकरण करा, ते करायला सांगतात म्हणून तुम्ही ते करायला पाहिजे. केवळ ध्यान आपल्याला ध्येयापर्यंत घेऊन जाऊ शकते ह्यामध्ये माझा विश्वास नाही. कारण, भारताच्या आध्यात्मिक इतिहासानुसार, हजारो वर्ष ध्यान करणारे लोक देखील आपल्या ध्येयापर्यंत पोहचु शकले नाहीत. असे मी बाबुजींना विचारले असता ते म्हणाले, 'हो, तुम्ही बरोबर आहात.' मी पुढे विचारले, 'मग तुम्ही ध्यान, शुद्धीकरण, ह्या गोष्टींचा नियम का घालता?' ते म्हणाले, 'आज्ञापालन. लोकांमध्ये आज्ञापालन निर्माण करण्यासाठी."



केवळ २५ अभ्यासींनी सुरुवात झालेल्या ह्या केंद्राची वाढ होवून आज ४५० अभ्यासी ह्या केंद्रात आहेत आणि नऊ ठिकाणी बुधवारचे सत्संग आयोजित केले जातात. ध्यानकक्षाच्या व्यतिरीक्तएक शेजघर, अभ्यासींना राहण्यासाठी वसतीगृह आणि गुरुदेवांचे कार्यालय निर्माण करायचे नियोजित आहे. सर्व अभ्यासींच्या व प्रशिक्षकांच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे हे उद्धिष्टे लवकरच साकार होतील अशी आशा आहे.

**To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**
© 2011 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.